MHRG110007792020

## नियमित दिवाणी दावा क्र.४९/२०२० मधील निशाणी क्र.५२ खालील आदेश

**(सुधीर मोरे वि. महेंद्र मोरे वगैरे)**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज वादी यांचे वारस अभिलेखावर आणणेस विलंब झालेने आपोआप झालेला उपशम (Abatement) रद्द होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द वाटपाकरिता व निरंतरचे ताकिदीकरिता दाखल केलेला आहे. सदरचा दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.४ गेणी सिताराम कांबळे पुर्वाश्रमीचे नाव श्रीम. गेणी बाळु मोरे उर्फ गेनिबाई बाबु कांबळे या दि.०९.०९.२०२४ रोजी मौजे मुंबई येथे राहत्या घरी मयत झाल्या आहेत. प्रतिवादी क्र.४ यांना मृत्यूसमयी मुगला रमेश बाबु कांबळे हे दि.१६.०४.१९९५ रोजी मयत असुन त्यांची पत्नी, मुलगा, मुलगी व काशिनाथ बाबु कांबळे असे कायदेशीर वारस आहेत. प्रतिवादी क्र.४ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याकरिता २२३ दिवसांचा विलंब झाला आहे. सदरचा विलंब झाल्याने वादीचा दावा प्रतिवादी क्र.४ करीता अबेट झाला आहे. सदरचा अबेट रद्द न झाल्यास वादीचे कधीही पैशात न भरुन येणारे अपरिमित नुकसान होईल. सदरचा झालेला अबेट रद्द करण्याची विनंती वादी यांनी केलेली आहे. सबब वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

३. प्रतिवादींनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, यातील प्रतिवादी क्र.४ हे मयत झाल्याने वारस रेकॉर्डवर घेण्याकरिता अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.४ हिची दोन नावे असून ती

व्यक्ती एकच आहे. सदरच्या अर्जाकामी योग्य तो आदेश होण्यास हरकत नाही.

४. निशानी क्र.५२ वरील अर्ज, त्यावरील म्हणणे व त्या पुष्ट्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीने प्रस्तुत अर्जान्वये प्रतिवादी क्र.४ गेणी सिताराम कांबळे पुर्वाश्रमीचे नाव श्रीम. गेणी बाळु मोरे उर्फ गेनिबाई बाबु कांबळे यांचे वारस अभिलेखावर घेणेबाबत झालेला विलंब माफ होवून मिळणेबाबत विनंती केलेली आहे. प्रस्तुत दावा हा वाटपाकरिता व निरंतरचे ताकिदीकरिता दाखल केला आहे. दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. वादीचे कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.४ गेणी सिताराम कांबळे पुर्वाश्रमीचे नाव श्रीम. गेणी बाळु मोरे उर्फ गेनिबाई बाबु कांबळे या दि.०९.०९.२०२४ रोजी मयत झाल्या आहेत व वादीने प्रस्तुतचा अर्ज हा दि. दि.१९.०७.२०२५ रोजी दाखल केलेला आहे. वादीने विलंबाने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला केवळ या कारणास्तव अर्ज नामंजूर करणे न्यायोचित होणार नाही. दाव्याचे स्वरुप विचारात घेता तसेच वादी यांनी केलेला विलंब पाहता प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादींना खर्च देणेचे अटीवर मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

MHRG110007792020

# आदेश

१. निशाणी क्र.५२ वरील अर्ज वादीने प्रतिवादी यांना र.रु.३००/- खर्च देणेचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

SONTAKKE AHILYABAI BALIRAM

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2025.12.18 11:30:34 +0530

माणगाव. [श्रीमती अ.प्र.मानव(श्रीमती अ. ब. सोनटक्के)]

दिनांकः-१७.१२.२०२५. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माणगाव.